# प्रेसनोट दि.२३/०९/२०१७

## नोकरी लावण्याच्या बहाण्याने फसवणुक करणाऱ्या टोळीस सायबर क्राईम सेल पुणे शहर यांनी दिल्लीतुन केली अटक

कोंढवा पुणे येथे राहणाऱ्या एका सुशिक्षीत बेरोजगार तरुणास त्याचे मेलवर **career jet** या कंपनीच्या मेलवरुन नोकरीविषयक मेल आला होता. पिडीत तरुणास नोकरीची आवश्यकता असल्याने ईमेलमध्ये नमुद केलेल्या मो.नं. ७८३८६३७९७७ वर पिडीत तरुणाने फोन केला असता समोरील महिलेने ती करीअर जेट कंपनी दिल्ली येथुन बोलत असल्याचे तसेच सदरची कंपनी नोकरी लावण्याचे काम करते असे सांगितले. त्यासाठी पिडीत तरुणास नाव रजिस्टर करण्यासाठी १६५० रुपये पेटीएमवर भरण्यासाठी सांगितले. त्यानंतर पिडीत तरुणाच्या मेलवर एक लिंक पाठवुन ऑनलाईन परिक्षा घेण्यात आली. ती परीक्षा दिल्या नंतर पिडीत तरुणास पास झाल्याचे कळविण्यात आले व शालेय कागदपत्रे मागविण्यात आली. त्या कागदपत्राच्या पडताळणीसाठी ५७०० रुपये फी भरण्यास सांगितले. त्या प्रमाणे पिडीत तरुणाने कागदपत्रे पाठविली व पेटीएम अकाऊंटवर पैसे भरले. त्याच्या रिसीट पिडीताच्या मेलवर प्राप्त पाठविण्यात आल्या. त्यानंतर पिडीताचा फोनवर मुलाखत घेण्यात आली व निवड झाल्याचे कळविण्यात आले. ऑफर लेटरसाठी १४,९०० रुपये भरण्यास सांगितले व डेबीटकार्ड नंबर मागण्यात आला. पिडीताने डेबीटकार्ड नंबर दिला व फोनवर आलेले ओटीपी देखील दिले. त्यानंतर तरुणास जेट एअरवेजचे अपॉईंटमेन्ट लेटर पाठविण्यात आले व ट्रेनिंग अमाऊंट २५,९००/- रुपये, आयडी कार्ड व गेटपास करीता ३२,५००/- रुपये, बँक अकाऊंट उघडण्यासाठी २९,२००/- रुपये, ड्रेस कोडसाठी ३८,५००/- रुपये भरण्यास सांगितले. पिडीताने या सर्व ट्रान्झेक्शनबाबत आलेले ओटीपी करीअर जेट कंपनीस दिल्याने त्यांच्या अकाऊंटवरुन हि रक्कम वजा होत गेली. त्यानंतर पिडीत तरुणाने जेट एअरवेज कंपनीच्या अधिकृत फोनवर फोन करुन विचारले असता त्यांना सांगण्यात आले की, जेट एअरवेज ऑनलाईन कुठलीही रक्कम घेत नाही. त्यानंतर फिर्यादी यांनी १,४८,३५०/- रुपयांची फसवणुक झाल्याबाबत सायबर क्राईम सेलकडे तक्रार दिली. त्यावरुन कोंढवा पोलीस स्टेशन गु.र.नं.३७०/२०१७ भा.दं.वि.क. ४१९,४२० आय.टी. अॅक्ट ६६(सी), ६६(डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायबर क्राईम सेलकडुन सदर गुन्ह्याचा समांतर तपास करण्यात येत होता. त्यानुसार आरोपी यांनी वापरलेल्या आरोपीने वापरलेले मोबाईल नंबर, पेटीएम अकाऊंट व ईमेल इत्यादींचे विश्लेषन करण्यात आले. त्यातुन आरोपी दिल्लीत असल्याबाबत निष्पन्न झाल्याने सौ. राधिका सु. फडके, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर क्राईम सेल, यांच्या नेतृत्वाखाली एक पथक दिल्ली पाठविण्यात आले. सदर पथकाने एम.बी.१, दुसरा मजला, मास्टर ब्लॉक, शरकपुर, नवी दिल्ली येथील फ्रॉड कॉल सेंटरवर धाड मारली असता सदर ठिकाणी गुन्ह्या करण्यासाठी वापरण्यात आलेले ७ मोबाईल, ५ सिमकार्ड, ८ डेबीट कार्ड, १ चेकबुक, १,३५,०००/- रुपये रोख इत्यादी मुद्देमाल मिळुन आल्याने सदरचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच कॉलसेंटर चालविणारा हरेंद्रकुमार विनयकुमार सिंग वय-२५ वर्ष रा. डी-५२, गल्ली नं.२ , विनोदनगर, नवी दिल्ली व त्याची साथिदार मिना पानसिंग बिस्ट वय-२१ वर्ष रा. टी-६५, घर नं.५ दुसरा मजला, बलजितनगर नवी दिल्ली यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडे अधिक तपास करता मुख्य आरोपी हा बिहार राज्यातील असुन १२ वी पर्यन्त शिक्षण घेतले आहे. कॉल सेंटरमध्ये काम करताने त्याला फसवणुक करण्याची मोडस कळाल्याने त्याने स्वतः चे कॉल सेंटर सुरु केले होते. आरोपींनी अश्याप्रकारे अनेक लोकांची फसवणुक केल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे सायबर क्राईम सेलचे एक पथक दिल्ली येथे तपास करीत आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ, मा. सपोआ श्री. मिलींद पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. राधिका फडके, पो.उप-निरी नितीन खामगळ व कर्मचारी अस्लम आत्तार, दिपक भोसले, अजित कुऱ्हे, राजकुमार जाबा, अमित औचरे, योगेश वाव्हळ, प्रसाद पोतदार, पुजा डाहाळे यांनी केली.

याव्दारे नागरींकाना अवाहन करण्यात येते की, मोबाईल नंबर ७८३८६३७९७७, ९५८२५१७४९५, ९६५४६१९७२०, ९८७३५२१६४९, ८५१०९८६५०४, ९६५४२७०३८१, ८५८६०५८१७८ या नंबरवरुन फसवणुक झाली असल्यास तात्काळ सायबर क्राईम सेल, पुणे शहर यांच्याशी संपर्क करावा. तसेच नोकरीबाबत शक्यतो मान्यताप्राप्त संस्था यांच्या कार्यालयात जावुनच आर्थिक व्यवहार करावेत.